माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २६१/२०२१**

**अपिलार्थी, श्री. अक्षय विलासराव बोंदगुलवार,**
**मेडीकल चौक, मुख्य रस्ता, शेगांव (बु.) ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत, शेगांव (बु) ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★ नागपूर ★ सत्यमेव जयते

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.१०.२०२२**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०८.०९.२०२० | २४.११.२०२० | २१.१०.२०२० | २४.११.२०२० |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा** सचिव, ग्रामपंचायत, शेगांव (बु) ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांच्याकडे **दिनांक** २०.१०.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "आपल्या कार्याकाळात केलेल्या निधीचा तपशिल कोणता निधी कोणत्या कामासाठी वापरण्यात आले" याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि. २४.११.२०२० रोजी मागणी केलेली माहिती प्रदान करण्यात आली.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २१.१०.२०२०** रोजी माहिती अधिकार अधिनियम, कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी **तथा** सहायक गट विकास अधिकारी,पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा,जि. चंद्रपूर यांचेकडे “मागणी करण्यात आलेली माहिती अप्राप्त असल्यामुळे.” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.११.२०२० रोजी अपिलार्थी यांच्या दि. ८.०९.२०२० रोजीच्या अर्जान्वये, जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिली व अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान

मान्य केले. त्यांनी त्यांचे समाधान झाले असल्याचे सांगितले. त्यामुळे सदरची अपिल अर्ज निकाली काढण्यात आले. असे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येत आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १८.०१.२०२१** रोजी "माहिती अपूर्ण दिली व कालावधीत माहिती सादर न करणे." असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक **२०.१०.२०२२** रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी श्री. अक्षय बोंदगुलवार उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, शेगांव (बु) ता. वरोरा, जि. चंद्रपूर श्री. आर. बी. गेडाम उपस्थित आहेत व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर श्री. जयंत शंकर धात्रक उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थी यांनी मागितलेल्या माहितीनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, शेगांव (बु) ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांनी ग्रामपंचायत शेगाव यांच्याकडून प्राप्त झालेल्या तपशिलावरून कोणता निधी कोणत्या कामासाठी वापरण्यात आला याबाबत दि. २४.११.२०२० रोजी प्रथम अपिल सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना माहिती प्रदान करण्यात आली. सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपूर यांनी जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या दरम्यान माहिती उपलब्ध करून दिल्यामुळे अपिलार्थी यांचे समाधान झाले, त्यानुषंगाने प्रथम अपिल अर्ज निकाली काढण्यात आले.

ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना जोडपत्र-अ प्रमाणे अपेक्षित माहिती प्रदान करण्यात आली आहे. तत्कालिन जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेता, प्रस्तुत व्दितीय अपिल क्र. २६१/२०२१ निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २०.१०.२०२२**

जावक क्रमांक ---415--- दिनांक ---25 JAN 2023---

A/S-2021/261-2021/Ganvir



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते